राज्यातील शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांनी विनिर्दिष्ट कालावधीसाठी शासन सेवा करणे अनिवार्य असल्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्र.एमईडी-१०१०/प्र.क्र.१८४/१०/शिक्षण-२

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :२८ मे, २०१०

वाचा :-

१) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक एनओसी-३०९५/सीआर-३०७/९५/शिक्षण-१, दि.२८.२.१९९६

२) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक पीजीएम-१३९७/सीआर-८/पार्ट-३/१५०/शिक्षण-१, दि.१९.०१.१९९८

३) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक पीजीएम-१३९७/सीआर-८/पार्ट-३/१५०/शिक्षण-१, दि.०६.०२.१९९८

४) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक पीजीएम-१३०१/४०६५/सीआर-४१८/२००१/शिक्षण-१, दि.२०.११.०१

५) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक पीजीएम-१००४/सीआर-६३३/०४/शिक्षण-२, दिनांक ११.३.२००५

६) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक एमईडी-१००६/सीआर-५/०६/शिक्षण-२, दिनांक ३१.०७.२००५

७) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक एमईडी-१००७/सीआर-४९०/०७/शिक्षण-२, दि.०८.०२.२००८

**प्रस्तावना**:- शासकीय अथवा महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयात पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर शासनाकडून/महानगरपालिकेकडून मोठया प्रमाणावर खर्च केला जातो. या खर्चाच्या तुलनेत विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येत असलेले शैक्षणिक शुल्क अत्यल्प आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षधावर शासन/महानगरपालिका करीत असलेला खर्च हा जनतेकडून आकारण्यात येत असलेल्या कराच्या उत्पन्नातून भागविला जात असल्याने जनतेच्या ऋणांची कांही अंशी फरतफेड व्हावी या उद्‌देशाने पदवी/पदव्युत्तर/अतिविशोषोपचार अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/संरक्षण दलाची सेवा करण्याबाबतचे बंधपत्र लिहून घेण्यात येते. संदर्भातधीत अ.क्र.७ येथील शासन निर्णय दि.८.२.२००८ अन्वये शासन सेवा बजावण्यास जर उमेदवाराने नकार दिला अथवा कोणत्याही कारणास्तव कुचराई केली तर त्याच्याकडून दंड वसूल करण्यात येईल असे नमूद

करण्यात आले आहे. शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय व दंत महाविद्यालयातून पदव्युत्तर व अतिविशेषोपचार (सुपर स्पेशालिटी) अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवाराने आवश्यक शासन सेवा न केल्यास त्याच्याकडून घेण्यात येणाऱ्या दंडाच्या रकमेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय अथवा दंत महाविद्यालयातून अतिविशेषोपचार (सुपर स्पेशालिटी) अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवाराने शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/संरक्षण दलाची दोन वर्षाची सेवा बजावण्यास नकार दिला अथवा कोणत्याही कारणास्तव कुचराई केली त्यांच्याकडून उमेदवाराकडून रुपये २५ लाख ऐवजी रु.२ कोटी (अक्षरी दोन कोटी फक्त) इतका दंड वसुल करण्यात यावा असा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी सन २०१० पासून घेण्यात येणाऱ्या अतिविशेषोपचार सामायीक परीक्षांसाठी लागू करण्यात येत आहे.

शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय अथवा दंत महाविद्यालयातून पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवाराने शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था /संरक्षण दलाची एक वर्षाची सेवा बजावण्यास नकार दिला अथवा कोणत्याही कारणास्तव कुचराई केली तर त्या उमेदवाराकडून रु.१५ लाख ऐवजी रु.५० लाख ( पन्नास लाख फक्त ) इतका दंड वसुल करण्यात यावा असाही शासनाने निर्णय घेतला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी सन २०११ पासून लागू करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (www.maharashtra.gov.in) या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्र. २०१००६०११८०४५४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(वि.ला.ढोले)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,

प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई, महानगरपालिका
आयुक्त, ठाणे, महानगरपालिका, ठाणे ,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सचिव, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली (पत्राद्वारे)
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई (५ प्रती),
संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई, (५ प्रती),
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
सर्व अधिष्ठाता, शासकीय/महानगरपालिका वैद्यकीय/दंत महाविद्यालये
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
मा.मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव,
मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव,
विभागातील सर्व उप सचिव/विशेष कार्य अधिकारी/अवर सचिव/कक्ष अधिकारी,
निवडनस्ती (शिक्षण-२)